


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २६ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक ११ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये




## राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज मिळणार, शिंदे सरकारचा मोठा निर्णय

राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा अखंडित आणि भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यात शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० राबविण्यात येत आहे. या मिशन मोडवरील या योजनेतून २०२५ पर्यंत सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट वाढवून ९००० मेगावॅट अधिक उर्वरीत ७००० मेगावॅट असे १६ हजार मेगावॉट विकेंद्रित सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा उद्देश साध्य होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत देण्यात येणारे प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली.यात वीज उपकेंद्राची देखभाल व सुधारणा, प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य, ग्रामपंचायतींना प्रोत्साहन व Revolving Fund या आर्थिक प्रोत्साहनासाठी सन २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीसाठी २ हजार ८९१ कोटी इतका अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी सन २०२४-२५ या वर्षीच्या ७०२ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.केंद्र शासनाच्या केंद्रीय आर्थिक सहाय्य निधीच्या धर्तीवर राज्य शासनाकडून उर्वरित क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती करिता राज्य सरकार



आर्थिक साह्य निधी ३०% (SGF) देण्यास व त्यासाठी सन २०२४-२५ ते सन २०२६-२७ या कालावधीसाठी एकूण १० हजार ४१ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. याअंतर्गत सन २०२५-२६ साठी ६ हजार २७९ कोटी व सन २०२६-२७ साठी ३ हजार ७६२ कोटी इतक्या निधीच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.राज्यात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीज बिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरवले असून राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णता मोफत वीज पुरवली जाणार आहे. याकरिता १४ हजार ७६१ कोटी रुपये वार्षिक अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर महावितरणचा सरासरी वीज खरेदीचा दर कमी होणार आहे. यातून आगामी काळातील कृषी क्षेत्रासाठी व औद्योगिक क्षेत्रासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा शासनावरील आर्थिक भार कमी होणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बळीराजा वीजदर सवलत योजना यशस्वीपणे राबविता येणार आहे.

## उमरा येथे २८-रोजी अण्णाभाऊ साठे जयंतीचे आयोजन



**नांदेड प्रतिनिधी :**

नांदेड : साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उमरा येथे २८-ऑगस्ट रोजी साजरी होणारा असून सकाळी ठीक १०:३० वाजता सरपंच साईनाथ पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर महामानवांच्या प्रतिमेचे पूजन प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांच्या हस्ते होईल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.मोहनराव गोविंदराव पाटील सिरसाट हे उपस्थित राहणार आहेत. जयंती मंडळाच्या वतीने दिवसभरात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून दुपारी २:३० वाजता अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक गावातील मुख्य रस्त्याने निघून साठे भवन येथे संपन्न होईल. असे जयंती मंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## सामाजिक कार्यकर्ते युवा पत्रकार किरण डावकर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

### खासदार बजरंग बप्पा व युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई यांनी कॉल करून दिल्या शुभेच्छा

**बीड (प्रतिनिधी)**

आपल्या लेखणीतून व सामाजिक कार्यातून सर्वांनाच भुरळ पाडणारे सामाजिक कार्यकर्ते व युवा पत्रकार किरण डावकर यांचा 24 ऑगस्ट रोजी वाढदिवस संपन्न झाला वाढदिवसाच्या निमित्ताने बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख याचबरोबर बीड जिल्ह्यातील अनेक आजी माझी आमदार जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य व भावी आमदार यांच्यासह अनेक नेते मंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला किरण डावकर यांचे कार्याचे कौतुक सर्व स्तरातून नेहमीच होत आले आहे आपल्या लेखणीतून भ्रष्ट नेते अधिकाऱ्यांना घाम फोडणारे सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे सामाजिक कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विषय असो किंवा रोजगाराबद्दल अशा अनेक मुद्द्यावर आपल्या अग्रलेखातून सरकारला प्रश्न विचारणारे आणि



सर्वांच्या हाकेला धावून जाणारे हक्काचा कार्यकर्ता म्हणून यांची ओळख आहे त्याचबरोबर सामाजिक कार्यामध्ये सतत आघाडीवर राहून सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी वर्तमानपत्राच्या लेखांमधून चर्चेत असणारे एक व्यक्तिमत्त्व आहे मित्रांना खरा आणि हक्काचा मित्र वाटणारे सुद्धा किरण डावकर आहेत त्यांच्या वाढदिवसानिमित्त राजकीय सामाजिक शैक्षणिक धार्मिक चळवळ अशा विविध क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळाला ही त्यांच्या कामाची पावती म्हणावी लागेल

## महिती अधिकार कार्यकर्ता महासंघ धारूर तालुका अध्यक्ष पदी सनी गायसमुद्रे यांची निवड.

किल्लेधारूर ।प्रतिनिधी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष बसवेकर, कार्याध्यक्ष शेखर कोलते यांच्या आदेशाने तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अजय भांगे, बीड जिल्हा कार्यध्यक्ष नितीन ढाकणे



उपाध्यक्ष ॲड. हरिभाऊ घाईतिडक, बीड जिल्हामुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे सरचिटणीस मुवशीर खतीब बीड जिल्हा उपाध्यक्ष सुदेश सिरसट यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर तालुका अध्यक्ष म्हणून सनी गायसमुद्रे यांची निवड करण्यात आली. माहिती अधिकार फेरडेशनची संपूर्ण नियम अटी व आचारसंहिता यांचे काटेकोरपणे पालन करून या पदावर जबाबदारीने काम करीन या पदाचा कुठलाही गैर वापर करणार नाही सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे. याच्या निवडीनंतर धारूर तालुक्यातील मित्र परिवारा कडून सर्व स्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्यांना विधानसभा निवडणुकीत घरी बसवा-बदामराव पंडित

### सिरसदेवीत शिवसैनिकांचा मेळावा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी** कापूस आणि तुरीचे टोकन विकणारे त्याबरोबरच उसात काटा मारून गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्यांना विधानसभा निवडणुकीत घरी बसवा असे सडेतोड प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसैनिकांचे जिल्हा परिषद सर्कल निहाय शिवसंवाद मेळावे आयोजित करून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे विधानसभेची मोर्चेबांधणी करत आहेत. याच पार्श्वभूमीवर दिनांक 25 ऑगस्ट 2024 रोजी सिरसदेवी येथे झालेल्या शिवसैनिकांच्या मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, शिवसेना अल्पसंख्यांक सेलचे तय्यब पठाण माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, अनीरुद्र लोंढे, शेख नूरभाई, सरपंच शेख फत्ते मामू, सरपंच मुकुंद बाबर, सरपंच किरण आहेर, उपसरपंच रणजित यादव, विलास शिंदे, शांताराम बांगर, संतोष पारिख, विठ्ठल रुचके, कैलास राठोड, कल्याण नवले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या 30 वर्षापासून गोरगरिबांनी सामान्य जनतेची मी प्रामाणिकपणे काम केली आहेत. कोणाचेही काम करताना जात-धर्म आणि गट-तट असे मी कधीही पाहिले नाही. त्यामुळेच मला गरिबांची आशीर्वाद मिळाले. मात्र गोरगरीब आणि शेतकऱ्यांसाठी असलेल्या घरकुल योजना, विहीर, संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजना याला थांबवण्याचे काम माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सातत्याने केले आहे. यातील शेतकरी आणि लाभार्थ्यांना या प्रत्येक योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मी न्यायालयीन लढाई लढलो आहे. योजना बंद करण्याचे काम अमरसिंह पंडित करतात तर त्या सुरू करा म्हणून विजयसिंह पंडित मागणी करतात. म्हणजे हे दोघे भाऊ सामान्य लोकांची दिशाभूल करतात असा घाणाघाती आरोप करून बदामराव पंडित म्हणाले की, कापूस आणि तुरीचे टोकन विकण्याचे काम या लोकांनी केले. त्यासोबतच शेतकऱ्यांच्या उसात



काटा मारण्याचे पापही साखर कारखान्याच्या माध्यमातून केले जाते. अशा लोकांना या विधानसभा निवडणुकीत डिपॉझिट जप्त करून कायमचे घरी बसवा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

कार्यक्रमास विठ्ठल रुचके,संतोष हिंगे, कैलास राठोड, कचरू जाधव, शामराव आडगळे, रघुनाथ थोरात, अविनाश धस, श्रीराम उबाळे, अभिषेक शिंदे, सुभाष ढाकणे, संजय काकडे, दीपक रडे, सिताराम गव्हाणे, सोमनाथ माने, बंडू नांद्रे, भीमराव राठोड, सोनाजी आडगळे, एकनाथ सानप, शिवाजी चव्हाण, भगवान बंडेकर, रामभाऊ आढागळे, कोंडीराम गोंजारे, सुंदर आढाळे, बंडू पटाईत, योगेश शिंदे, श्रीमंत शिंदे, भाऊसाहेब पवार, शेषराव राठोड, भास्कर मुलांडे, तुकाराम रुचके, जनार्दन चाळक, भरत राऊत, चंद्रसेन उबाळे, पापालाल चव्हाण, भरत राऊत, राहुल सानप, पंडितराव राऊत, विश्वंभर लोंढे, बाबा मोटे, लक्ष्मण शिंदे, हिरामण खरवडे, बंडू राठोड, दामोदर मोरे, लक्ष्मीनारायण शिंदे, गजानन मोरे, बाळू हाळनोर, शिवाजी टाकळकर, यशवंतराव भद्रे, शेख अली आदींसह शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी शिंदे, प्रास्ताविक रघुनाथ थोरात यांनी केले तर आभार बंडू नांद्रे यांनी मानले.

# साठवण तलावाच्या भिंतीवरील झाडाझुडपांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष ; मान्सुनपुर्व दुरुस्तीचा कोट्यवधींचा खर्च कोणाच्या घशात? :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- बीड जिल्ह्यातील जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ अंतर्गत साठवण तलावाच्या भिंतीवर मोठमोठाली झाडे, झुडपे असुन यामुळे तलावाच्या भिंतीला धोका निर्माण होण्याची शक्यता असुन त्यांची मान्सुनपुर्व साफसफाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी ६ महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे केल्यानंतर शिवकुमार स्वामी अपर जिल्हा दंडाधिकारी बीड यांनी तहसीलदार बीड आणि कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड यांना निवेदनातील नमुद मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे लेखी आदेश दिलेले आहेत मात्र यापत्राला संबंधितांनी केराची टोपली दाखवल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करून साठवण तलावाच्या भिंतीवरील झाडाझुडुपांची साफसफाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.




मान्सुनपुर्व दुरूस्तीचा कोट्यवधींचा खर्च पाटबंधारे विभाग नेमकं कोणाच्या घशात घालते ??:- डॉ.गणेश ढवळे

पाणी अडवा पाणी जिरवा यासह शेतकऱ्यांना उन्हाळ्यात,हिवाळी हंगामात पिकांना पाणी मिळावे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी बीड जिल्ह्यात माजलगाव, बिंदुसरा,कुंडलिका यासह अनेक छोटे मोठे साठवण तलावांची निर्मिती करण्यात आली आहे.या तलावाच्या देखभाल दुरुस्तीसाठी पाटबंधारे विभाग दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करते. मान्सुनपुर्व दुरूस्तीच्या नावाखाली लाखोंची बिले फाडली जात असताना तलावांच्या भिंतीवरील झाडे,झुडपे याकडे मात्र साफ दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे मान्सुनपुर्व दुरूस्तीचा कोट्यवधींचा खर्च पाटबंधारे विभाग नेमकं कोणाच्या घशात घालते हा खरा प्रश्न आहे. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी होऊन कारवाई करण्यात यावी. पाणी टंचाई आराखडे आखताना पाहणी करणा-या तहसिल व पाटबंधारे संयुक्त पथकाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष जिल्हा प्रशासन पाणी टंचाईचे आराखडे आखताना पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणी विद्युत मोटारी अथवा अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा अवैध पाणी रोखण्यासाठी संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, तहसिल तसेच गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी व महावितरणचे कर्मचारी यांची संयुक्त पथके पाहणी करून जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर करतात तेव्हा तलावाच्या भिंतीवरील झाडा झूडपांकडे जाणिवपूर्वक डोळेझाक करताना दिसुन येतात. त्यांनी जिल्हा प्रशासनाला तसा अहवाल पाठवला तर दरवर्षी नियमित साफसफाई होईल मात्र याकडे तहसिल प्रशासन गांभीर्याने पाहताना दिसुन येत नाही.

# दर्जेदार सोयाबीनचे वाण उपलब्ध करून देण्यात यशस्वी ठरत आहे अंबाजोगाईतील उमेद सखी

**बीड । प्रतिनिधी**

महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उंच भरारी घेतलेली आहे. परळी येथील कृषी महोत्सवात अंबाजोगाई येथील उमेद सखी महिला शेतकरी उत्पादन कंपनी मर्यादित ने दर्जेदार सोयाबीन बियाण्याची विक्री करून नवीन इतिहास घडविला आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे तयार करण्यात आलेले केडीएस 726 (फुले संगम), डीएस 228 (फुले कल्याणी), केडीएस 992 (फुले दूर्वा) डीएस 753 (फुले कीमया) या सोयाबीनचे वणाचे दालन दिसून आले. या दालनाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात विचारपूस करीत असल्याचे पहाव्यास मिळते. उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये



732 महिलांचा समूह आहे. गुणवत्ता व बीजोउत्पादनातील कायदेशीर तरतूदिबाबत कुठलीही तडजोड न करता उत्पादित केलेले हे दर्जेदार बियाणे आहे. खरीप 2023 चा सोयाबीन बीज उत्पादन कार्यक्रम राबविण्याचा उमेद सखी पॅटर्न असून या अंतर्गत 18 एकर जमिनीवर बीज उत्पादन करण्यात आले. बीज उत्पादकांची संख्या आठ आहे. जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात या उमेद सखी कडून रितसर कायदेशीर नोंदणी केलेली आहे. भेसळ ओळख व त्याचे नियंत्रण करण्यासाठी स्वतः कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत भेसळ काढून त्याची योग्य विल्हेवाट करण्यात येते. यासह विविध शास्त्रज्ञ तसेच कृषी क्षेत्रातील अधिकारी यांच्याकडून जिथे बियाणे आहे त्या शेतावर जाऊन पाहणी आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. अडीअडचणी अथवा काही प्रश्न असल्यास नवीन सूचना त्याची सखोल अभ्यास व चर्चासत्र घडवून आणले जाते. जेणेकरून शेतकऱ्यांना पुरेपूर त्याचा उपयोग होईल. बियाण्याचे प्रक्रिया आणि पॅकेजिंग हे प्रत्यक्ष कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालीच केले जात असल्याची माहिती प्रियंका काळे या उमेद सखीने दिली.

बियाणे उगवण तपासणी शासनमान्य प्रमाणित लॅब मध्येच केली जाते. यासोबतच शेतकऱ्यांचे कच्चे बियाणे खरेदी करतेवेळी सुद्धा तपासणी केली जाते. बियाणे बाबत शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदविलेल्या आहेत. शेतकरी म्हणतात, उमेद कडून मिळालेल्या बियाणांची उगवण अतिशय उत्तम आहे. यांना फुलधारणा योग्य आहे. हे. बियाणे भेसळ विरहित असे आहेत. या बियाण्यापासून उगवलेल्या सोयाबीनमध्ये शेंगांची संख्या भरपूर आहेत अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिल्या.

# मप्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी साधला लखपती दिदींशी संवाद

**आर्थिक सक्षमतेबरोबर आत्मसन्मान मिळाल्याची लखपती दीदींची भावना**



जळगाव : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जळगाव येथे देशातील निवडक लखपती दीदिंशी शी संवाद साधला. लखपती दीदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतले. "लखपती दीदी योजनेमुळे महिला बचतगटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. त्याचबरोबर आम्हाला आत्मसन्मान ही मिळाला."अशी भावना लखपती दीदींनी यावेळी व्यक्त केली. येथील प्राइम इंडस्ट्रियल पार्क मैदानावर झालेल्या लखपती दिदी संमेलनापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील निवडक अशा ८० लखपती दीदींशी संवाद साधला. या लखपती दिदी संवाद कार्यक्रमात देशातील वेगवेगळ्या राज्यांतील बँक सखी दिदी, ड्रोन दीदी, पशु दिदी, कृषी दिदी म्हणून नावारूपाला येऊन लखपती झालेल्या महिला उपस्थित होत्या. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीष महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. ०००००००

# शेतकरी जीवनाला अनुकूल कृषी महोत्सव

बीड, दि. 25: बीड जिल्ह्यातील बहुतेक नागरिक हे शेत जीवनाशी संबंधित असून मोठ्या संख्येने शेतकरी बांधव या जिल्ह्यात आहेत. या जिल्ह्याला पहिल्यांदा कृषी मंत्री म्हणून धनंजय मुंडे स्थानिक नेतृत्व मिळाले. त्यामुळे दूध शर्करा योग जुळून आला.

कृषिमंत्री यांच्या मार्गदर्शनातून जिल्ह्यातील ऐतिहासिक तसेच धार्मिक महत्त्व लाभलेल्या परळी वैजनाथ या ठिकाणी कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. हा महोत्सव 21 ते 26 ऑगस्ट तब्बल सहा दिवस सुरू आहे हे दिवस सणासुदीचे असल्यामुळे शेतकरी बांधवांसह भगिनींसाठीही या ठिकाणी विशेष दालने अशी एकूण 300 च्यावर दालने या ठिकाणी मांडण्यात आलेली आहेत. अवजारे/मशिनरी- 06 ट्रेकटर-06 , नर्सरी - 03 खते- 25 बियाणे- 40, औषधी -20 सिंचन ड्रीप- 41 ,प्लास्टिक 25 अवजारे टूल्स 04 गृहउपयोगी वस्तू 70 ,धान्यमहोत्सव - 25, सेंद्रिय दालन-024, उमेद दालन 24 मविम व इतर महिला बचत गट मिलेट दालन - 30 विद्यापीठ - 51 शासकीय स्टॉल-35 असे एकूण 434 दालने आहेत. या कृषी महोत्सवात कृषी उपयोग उपयोगी मोठ्या यंत्रांसह लहान सहान यंत्रांचीही दालने असून यांनाही मोठ्या प्रमाणात मागणी आहे. ट्रॅक्टर, कापणी यंत्र, फवारणी सामुग्री, शेतात पाणी पुरविण्यासाठी लागणारे पाईप विविध पद्धतीने करण्यात येणारे सिंचन व्यवस्थेसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री चे दालनेही दिसले. प्रात्यक्षिक बघण्यात आणि विचारपूस करण्यात शेतकरी गुंग दिसला.

यंदाच्या कृषी महोत्सवात एक विशेष महत्त्वाची बाब म्हणजे आंबेजोगाई येथील उमेद सखीचे दालन विशेष आकर्षण ठरते आहे. या दालनात नवीन सोयाबीन बियाणाचे वाण उपलब्ध करून दिले जात आहे हे महिलांद्वारे चालविलेले दालन आहे. यासोबतच शेतीपूरक व्यवसायावर आधारित बरेचसे दालन या ठिकाणी आहेत जसे जांभूळ दुधी कारलं बीट यांच्यापासून तयार ज्यूस आवळा कॅन्डी पालक बीट यांचा रसातून तयार शेवया आंब्याचे लोणचे गूळ असे विविध दालनही या ठिकाणी आहेत ज्यांनाही शेतकरी मोठ्या प्रमाणे भेट देत असल्याचे दिसते. या ठिकाणी पशुप्रदर्शन ही लावण्यात आलेले आहे या अंतर्गत चांगल्या दर्जाचे शेळी, मेंढी , गाय, म्हस, घोडा कोंबड्या यांचे प्रदर्शन मांडण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून याचा लाभ कसा होऊ शकतो हे सांगण्याचा प्रयत्न या प्रदर्शनाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. पावसाळ्यात काही प्रमुख रानभाज्या जमिनीतून उगवतात त्या याच मोसमात घेत असल्यामुळे त्याचे विशेष औषधी तसेच पोषण अंतर्गतही महत्त्व आहे याचीही दालन या ठिकाणी होते. शेतकऱ्यांनी नवनवीन संशोधना अंतर्गत तयार करण्यात आलेले बियाणे वापरावे तसेच पिकांवर येणाऱ्या रोगांसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतात याची माहिती चर्चासत्र अंतर्गत कृषी तज्ञांनी खुल्या मंचावर आपले विचार मांडले आहेत. यासह या मंचावरून यशस्वी शेतकऱ्यांनी त्यांची यशोगाथा सांगितली. कोण कोणते प्रयोग राबविले याचीही माहिती सर्व शेतकरी बांधवांना दिली.



ड्रोन द्वारे कशी फवारणी करावी याची प्रात्यक्षिक ही या ठिकाणी दाखवण्यात आलेले आहे. येणाऱ्या काळात ड्रोन द्वारे फवारणी दिसणे हे सर्वसामान्य होईल आणि यामुळे फवारणी करताना होणाऱ्या त्रासापासून शेतकऱ्यांची सुटका ही होईल. या कृषी महोत्सवात चांदा ते बांदयापासूनच्या शेतकऱ्यांनी भेटी दिल्या. गडचिरोली, चंद्रपूर, वाशिम ते कोकणतील रत्नागिरी, सिंधुदुर्ग इथपासून शेतकरी आलेले आहेत. टप्प्याटप्प्याने प्रत्येक दालनाला भेट देऊन शेतीत नवीन काय करता येईल हे समजून घेत आहेत आणि वैज्ञानिक पद्धतीचा अधिक कसा उपयोग करता येईल यासोबतच सेंद्रिय, जैविक शेती पुन्हा नव्याने कशी करता येईल हेही माहिती जाणून घेत असल्याचे या ठिकाणी दिसले.


# द्रोणागिरी सेक्टर ५१ देव कृपा चौकात हिट अँण्ड रन चा थरार

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

उरण तालुक्यात सिडको च्या अखत्यारीत असलेल्या द्रोणागिरी नोडचे झालेले विस्तारीकरण, वाढती लोकसंख्या त्याचबरोबर रस्त्याच्या कडेला दुतर्फा लावण्यात आलेल्या हातगाड्या, त्याचप्रमाणे भर रस्त्यावर भरणारा आठवडा बाजार हे सारे कुणाच्या परवानगी ने किंवा कुणाच्या मर्जीने चालत आहे हा एक अभ्यासाचा विषय आहे.

परंतु सिडकोने द्रोणागिरी नोडचे विस्तारीकरण केले आहे रस्ते नाले बांधले आहेत, पण जीथे चार रस्ते जोडले आहेत त्या ठिकाणी अजूनही सिग्नल ची व्यवस्था करण्यात आली नाही. त्यामुळे दिवसभर वाहनांची ये जा मोठ्या प्रमाणात होत असते. यामध्ये वाहतूकीच्या नियमांची पायमल्ली होत आहे. कुणीही दुचाकी चारचाकी चालक कुठूनही येत आहे. आणि अशावेळी तंद्रीत असणाऱ्या वाहन चालकांकडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री ८ वाजता च्या सुमारास द्रोणागिरी देवकृपा बसस्टँड देवकृपा चौकात, उरण पनवेल रोडवर एकविरा पान पट्टी समोर उरण कडून येणाऱ्या हरियाणाची पासिंग असलेल्या भरधाव होंडा



सिटीने ४ ते ५ जणांना उडवीत नेत तसेच समीर गॅरेज समोर उभ्या असलेल्या ७ ते ८ मोटार सायकल तसेच त्यातीलच एका स्कुटीवर उभ्या असलेल्या व्यक्तीस उडवून एका हातगाडीलाही उडविला आहे.हिट अँण्ड रन चा थरार येथील प्रवासी नागरिकांना व द्रोणागिरी रहिवासियांना अनुभवास मिळाला आहे.

एकंदरीत द्रोणागिरी नोड विकसित करण्यात आले आहे मात्र अजूनही नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# अंशकालीन निदेशकांची बैठक संप



जालनाअसलम कुरेशी कला, क्रीडा व कार्यनुभव अंशकालीन निदेशकांची विभागीय बैठक जालना येथे संपन्न झाली. या बैठकीस जालना, संभाजीनगर, बीड, जळगाव, बुलढाणा, परभणी, हिंगोली, लातूर यासह इतर जिल्ह्यातील निदेशक उपस्थित होते. या बैठकीत दिनांक ५ जुलै २०२४ रोजी पारित झालेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील उच्च प्राथमिक शाळेत कला क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकांसाठी कायम संवर्ग निर्माण करून यु-डायस डेटा २०२४ नुसार राज्यातील ५२५३ जागावर कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकांची नेमणूक करण्यासंदर्भात शासन स्तरावरून अध्यादेश काढून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना निवेदन देणे व पंधरा दिवसाच्या आत शासनाने निर्णय न घेतल्यास आझाद मैदान मुंबई येथे सर्व कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन निदेशकांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन/उपोषण करण्यात येईल असे ठरले. या बैठकीस दीपक पवार, के.एम. खान, राजेंद्र गव्हाड, भागवत शिंदे, छाया देशमुख, कांचन वाघ, कल्पना गरुड, कल्याण धायडे, महेंद्र सोनवणे, राजेश लहाने, पांडुरंग क्षीरसागर, हनुमान वाघ, संजय गव्हाड, सुरेश पडूळ यांच्यासह अनेक निदेशक उपस्थित होते.

# दानपुण्य करण्याने मनुष्य जीवनास सदगती प्राप्त होते-पू.भिक्खू धम्मशील थेरो

माजलगाव । प्रतिनिधी उपासकाचा तिसरा सदगुण हा दान आहे. दानाचे प्रकार तीन असून पहिला प्रकार म्हणजे अमिषदान आहे.जे जे डोळ्यांनी दिसते म्हणजे अन्न,वस्त्र,औषध, निवारा,पैसे,रक्त,कपडे त्यास आमिष दान म्हणतात दुसरा प्रकार हा अभयदान हा आहे.अभय निराधारांना आधार देणे. भीती मुक्त करणे दुःखी लोकांचे सांत्वन करणे. आसरा देणे होय तर तिसरा गुण म्हणजे, धम्मदान हा आहे, धम्म म्हणजे नीती असे होय.धम्मदान हे सर्व श्रेष्ठ दान आहे. पाच रत्नापेक्षा धम्मदान श्रेष्ठदान आहे. कारण रत्नाची चोरी होते धम्मदानाची चोरी होऊ शकत नाही.त्याच बरोबर पंचशीलाचे पालन करूनच दान दिले तर ते तेच पुण्य दान होते .दानं दुग्गती निवारणं दानामुळे दुर्गतिचे निवारण होते सुगती आणि दुर्गती यामधील फरक म्हणजे, सुगती म्हणजे शांततेत मरण होय,तर दुर्गती म्हणजे तडफडून मरण होय. दान हे सद् गती कडे जाण्याची एक पायरी आहे. स्वर्ग म्हणजे सुगती सुगती म्हणजे शांततेत समाधानाचे मरण होय. औदार्य म्हणजे उदात अंतकरणाने केलेले दान होय.अडीच हजार वर्षापासून बुद्धाचे तत्त्वज्ञान मानवाच्या जीवनाचे कल्याण करत आहे. एवढी ताकद धम्मामध्ये आहे. ४५ वर्षापर्यंत हे दान बुद्धांनी स्वतः मनुष्यांना दिले. दान हे ऊसा समान असून, वरच्या भागात मधल्या भागात व खालचा भागात कुठेही खा ऊस गोडच लागतो. याप्रमाणे आधी, मध्य आणि अंतःही धम्म कल्याणकारीच आहे.असे प्रतिपादन पू. भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार येते रविवारी दि.२५ ऑगस्ट



२०२४ रोजी साप्ताहिक बुद्ध वंदना निमित्ताने धम्मदेशनेत केले. यावेळी पूजनीय भिक्खू धम्मशील थेरो हे " उपासकाचे चार सद्गुण " या विषयावर बोलत होते. त्यापैकी आज तिसरा सद् गुण "दान" या विषयावर सुंदर धम्मदेशना दिली. यावेळी साप्ताहिक पूजेचे यजमान चतुराबाई चिमाजी खळगे, व दत्तात्रय चिमाजी खळगे यांनी भोजनदान दिले. तसेच दिनेश निसर्गंध यांनी सुंदर भीमगीत सादर केले सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सदाशिव भालेराव यांनी केले, सूत्रसंचालन ॲड.दशरथ मकसरे यांनी तर, आभार सचिव जी एन घनगाव यांनी मानले. यावेळी सद् धम्म सेवा संघाचे पांडुरंग जाधव, भगवानराव सातपुते, सोपान उजगरे, रविकांत उघडे, एम.बी चांदमारे, वाल्हाबाई टाकणखार, लीलाताई उजगरे, अरुण नाकलगावकर, धम्मपाल जावळे हे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ नेते कचरू खळगे, संजय बागुल, पद्माकर रुचके, अशोक मगर, बाबा टाकणखार, कॉन्ट्रॅक्टर भास्कर घाडगे, लताबाई बनसोडे, नगरसेविका सुधामतीताई पौळ, बबीताबाई सावंत, वंदनाताई शिनगारे, संघमित्रा अर्बन बँकेचे अध्यक्षा सुनिता घनघाव, मनीषा एकनाथ मस्के आदि तालुक्यातील उपासक उपस्थित होते.

# शेतात काम करणाऱ्या बौद्ध महिलेस सरपंच पतीकडून जातीवाचक शिवीगाळ व मारहाण

## आरोपी विरुद्ध अट्रोसिटीसह इतर गुन्हे दाखल

**परळी । प्रतिनिधी**

स्वतःच्या शेतात काम करणाऱ्या बौद्ध महिलेस जातीवाचक शिवीगाळ करीत लाथा बुक्याने मारहाण करणाऱ्या परळी तालुक्यातील इंजेगाव येथील सरपंच पतीसह इतरांविरुद्ध अट्रोसिटी व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील आरोपींना अटक करण्याची मागणी फिर्यादी सखुबाई यशवंत सोनवणे यांनी केले आहे. या घटनेने आंबेडकरी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, परळी तालुक्यातील इंजेगाव येथील बौद्ध महिला सखुबाई यशवंत सोनवणे या त्यांच्या शेतात कष्ट करून आपले व कुटुंबाची दिनचर्या भागवतात . दिनांक 15 ऑगस्ट 2024 रोजी सखुबाई सोनवणे या त्यांच्या जाऊ अनुराधा लक्ष्मण सोनवणे यांच्यासोबत शेतात काम करत असताना इंजेगावचे गावचे सरपंच यांचे पती अमोल मारुती कराड व त्यांचे सहकारी शिवहार गोपाळ कराड, श्याम सुखदेव कराड, विकास महादेव कराड यांनी त्यांच्याशी धक्काबुक्की करत मारहाण केली. व जीवे मारण्याची धमकी दिली तसेच चाकूने दंडावर वार केल्याचे सखुबाई सोनवणे यांनी पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

सखुबाई यशवंत सोनवणे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी दिनांक 23 ऑगस्ट रोजी आरोपी अमोल मारुती कराड, शिवहार गोपाल कराड ,श्याम सुखदेव कराड व विकास महादेव कराड सर्व राहणार इंजेगाव, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याविरुद्ध कलम 118 (1) , कलम 115(2), 352, 351 ( 2), 351( 3), 3(5), तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम 3(1)(r),3(1)(s),व 3(2)(va) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान या घटनेतील सर्व आरोपींना अद्यापही अटक झाली नसल्याने त्यांना तात्काळ अटक करावे अशी मागणी सखुबाई सोनवणे यांनी केली आहे. या घटनेने आंबेडकरी समाजात संतापाची लाट उसळली आहे.

## मराठा सेवा संघाच्या वर्धापनदिनी मराठा समाजातील कर्मचाऱ्यांचा होणार सन्मान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : मराठा सेवा संघाच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी १- सप्टेंबर रोजी किनवट गोकुंदा येथील छत्रपती संभाजी राजे विद्यार्थी वसतिगृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांत चमकदार कामगिरी करणाऱ्या महिला-पुरुष शिक्षक ,प्राध्यापक, डॉक्टर ,वकील ,इंजिनिअर, पत्रकार आदी अधिकारी कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. मराठा सेवा संघाने गेल्या ३४ वर्षांत समाजाला नवी दिशा देण्याचे काम केले आहे. वैचारिक क्रांती घडवून महाराष्ट्रीतील जातीय दंगली कमी झाल्या आहेत. महापुरुषांच्या विचाराने चालणाऱ्या मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड संभाजी ब्रिगेड यासह ३३ कक्ष आहेत.सेवा संघाच्या माध्यमातून बहुजनांचा खरा इतिहास मांडण्यात आला आहे.कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला-पुरुष अधिकारी कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार असल्याचे किनवट मराठा सेवा संघाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## आष्टी येथे होणाऱ्या दहीहंडी महोत्सवाला मोठ्या संख्येने सहभागी व्हा-युवा नेते प्रणव जावळे

पाटोदा । प्रतिनिधी येत्या बुधवार दिनांक 28 ऑगस्ट रोजी आष्टी शहरात होणाऱ्या दहीहंडी महोत्सवास आष्टी,पाटोदा,शिरूर(का) तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते प्रणव जावळे यांनी केले आहे. आष्टी शहरातील पंचायत समिती प्रागणात बुधवार दिनांक 28 ऑगस्ट रोजी सायंकाळी 7:00 मा.जयदत्त भैय्या धस युवा मंच च्या वतीने भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले,असुन या महोत्सवासाठी राज्याचे माजी महसूल राज्यमंत्री मा.



सुरेश आण्णा धस यांच्यासह मराठी चित्रसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री मानसी नाईक, सई मांजरेकर, झेबा शेख, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या महोत्सवामध्ये डीजेच्या तालावर तरुणाई फिरकणार असून निशा कुसेकर ही प्रसिद्ध सूत्रसंचालिका या महोत्सवाचे सूत्रसंचालन करणार आहे. या दहीहंडी महोत्सवाची जयंत तयारी सुरू असून आष्टी शहरात होणाऱ्या या दहीहंडी उत्सवात आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील सर्वच नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी,असे आवाहन युवा नेते प्रणव जावळे यांनी के ले

## केळूसकर गुरुजी सारखे आदर्श शिक्षक लाभले तर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे महामानव घडतात-चेतन निसर्गंध

### शिक्षक चांगला असल्यास भावी पिढी घडू शकते- पो नि धनंजय ढोणे

परळी । प्रतिनिधी केळूसकर गुरुजी सारखे आदर्श शिक्षक लाभले तर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे महामानव घडतात, असे प्रतिपादन फुले -आंबेडकरी अभ्यासक चेतन निसर्गंध यांनी केले. ते स्टुडन्ट फॉर रिकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी व फुले - आंबेडकरी अभ्यास समूहाच्या वतीने आयोजित दादा केळूसकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्रबोधनपर चर्चासत्राचे चे उद्घाटक म्हणून परळी येथील संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव, परळी औ. विद्युत केंद्रचे सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, ए.तू. कराड, रानबा गायकवाड, नवनाथ दाणे व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



प्रा प्रविण फुटके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दादा केळूसकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी सांगितले की, शिक्षक चांगला असल्यास भावी पिढी घडू शकते, आजच्या शिक्षकांनी आदर्श पिढी घडवावी असे विचार व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना चेतन निसर्गंध म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक व खाजगी आयुष्यात केळूसकर गुरुजी यांनी शेवट पर्यंत साथ दिली. केळूसकर गुरुजी यांनी गौतम बुद्ध, क्षत्रिय कुलावंत छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज यांचे चरित्र मराठीत पहिल्यांदाच लिहिले थॉम्स पेन यांच्या राईट ऑफ मॅन इंग्रजी पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना सयाजीराव गायकवाड महाराजांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून दिली. मात्र ते उपेक्षित राहिले. तर अध्यक्षीय समारोपात प्रा फुटके यांनी आजच्या शिक्षकांनी केळूसकर गुरुजींचा आदर्श घेवून विद्यार्थी घडवावेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फुले - शाहू आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक भगवान साकसमुद्रे यांनी केले. कार्यक्रमात शरद राठोड, प्रविण जाधव, ए.तू कराड यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास पत्रकार श्रीराम लांडगे, परमेश्वर मुंडे, न प चे महदु मस्के, एसबीआयचे जयपाल कांबळे, महेश मुंडे, हरिभाऊ आगलावे,फुले - आंबेडकरी अभ्यास समूहाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन आकाश देवरे यांनी मानले.




## दर्जेदार सोयाबीनचे वाण उपलब्ध करून देण्यात यशस्वी ठरत आहे अंबाजोगाईतील उमेद सखी

बीड । प्रतिनिधी महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उंच भरारी घेतलेली आहे. परळी येथील कृषी महोत्सवात अंबाजोगाई येथील उमेद सखी महिला शेतकरी उत्पादन कंपनी मर्यादित ने दर्जेदार सोयाबीन बियाण्याची विक्री करून नवीन इतिहास घडविला आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे तयार करण्यात आलेले केडीएस 726 (फुले संगम), डीएस 228 (फुले कल्याणी), केडीएस 992 (फुले दूर्वा) डीएस 753 (फुले कीमया) या सोयाबीनचे वणाचे दालन दिसून आले. या दालनाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात विचारपूस करीत असल्याचे पहाव्यास मिळते. उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये 732 महिलांचा समूह आहे.गुणवत्ता व बीजोउत्पादनातील कायदेशीर तरतूदिबाबत कुठलीही तडजोड न करता उत्पादित केलेले हे दर्जेदार बियाणे आहे. खरीप 2023 चा सोयाबीन बीज उत्पादन कार्यक्रम राबविण्याचा उमेद सखी पॅटर्न असून या अंतर्गत 18 एकर जमिनीवर बीज उत्पादन करण्यात आले. बीज उत्पादकांची संख्या आठ आहे. जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात या उमेद सखी कडून रितसर कायदेशीर नोंदणी केलेली आहे. भेसळ ओळख व त्याचे नियंत्रण करण्यासाठी स्वतः कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत भेसळ काढून त्याची योग्य विल्हेवाट करण्यात येते. यासह विविध शास्त्रज्ञ तसेच कृषी क्षेत्रातील अधिकारी यांच्याकडून जिथे बियाणे आहे त्या शेतावर जाऊन पाहणी आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. अडीअडचणी अथवा काही प्रश्न असल्यास नवीन सूचना त्याची सखोल अभ्यास व चर्चासत्र घडवून आणले जाते. जेणेकरून शेतकऱ्यांना पुरेपूर त्याचा उपयोग होईल. बियाण्याचे प्रक्रिया आणि पॅकेजिंग हे प्रत्यक्ष कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालीच केले जात असल्याची माहिती प्रियंका काळे या उमेद सखीने दिली.

बियाणे उगवण तपासणी शासनमान्य प्रमाणित लॅब मध्येच केली जाते. यासोबतच शेतकऱ्यांचे कच्चे बियाणे खरेदी करतेवेळी सुद्धा तपासणी केली जाते. बियाणे बाबत शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदविलेल्या आहेत. शेतकरी म्हणतात, उमेद कडून मिळालेल्या बियाणांची उगवण अतिशय उत्तम आहे. यांना फुलधारणा योग्य आहे. हे. बियाणे भेसळ विरहित असे आहेत. या बियाण्यापासून उगवलेल्या सोयाबीनमध्ये शेंगांची संख्या भरपूर आहेत अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिल्या.

# हेलीग्रिझम ईश्वरी फुलांची शेती करुन शेतकरी झाला लखपती

बीड, 25 : - राज्यस्तरीय कृषी महोत्सवात ईश्वरी फुल म्हणून ओळखले जाणारे वैज्ञानिक नाव ''हेलीग्रिझम' असणारे फुलांची माहिती जाणून घेण्यात बरेच शेतकरी उत्साही दिसले. हेलिक्रिझम या फुलांना तडतडी फुल न सुकणारे फुल अथवा ईश्वरी फुल म्हणून ओळखले जाते. बीड जिल्ह्यातील पांगरी या गावात राहणारे प्रयोगशील शेतकरी ईश्वर शिवाजी शिंदे



हे या फुलांची शेती करतात. हेलीग्रिझम हे फुल प्लास्टिक सारखे दिसते. आणि वर्षभर या फुलांना काहीच होत नाही. या फुलांना पाण्यात बुडवल्यावर ते चिमतात आणि उन्हात ठेवल्यावर पुन्हा फुलतात हे या फुलाचे विशेषत्व आहे. श्री शिंदे यांनी यांत्रिकी अभियंताची पदवी घेतली आहे. मात्र, त्यांना शेतीमध्ये विविध प्रयोग करायला आवडत असल्यामुळे ते प्रयोगशील शेतकरी म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहेत.

ईश्वरी फुल पर्यावरण पूरक असून वर्षभर फुल सुकत नाही. प्लास्टिकच्या फुलांना पर्याय म्हणून या फुलांची मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याचे श्री शिंदे यांनी बोलताना सांगितले. त्यांनी 1 एकर मध्ये ईश्वरी फुलाची शेती केली असून अडीच महिन्यात फुलं उगवत असल्याचे त्यांनी सांगितले. या फुलांच्या शेतीमुळे त्यांनी सात ते आठ लाख कमावले आहेत. ज्याप्रमाणे झेंडूची, शेवंतीच्या फुलांची शेती केली जाते त्याचप्रमाणे हेलिक्रिझम या फुलांचीही शेती केली जात असल्याचे शिंदे यांनी सांगितले. या फुलांची शेती जास्तीत जास्त व्हावी यासाठी कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांना माहिती देण्याचे काम सु शिंदे करीत आहेत यासह मंदिर देवालयाच्या समित्यांसोबतही त्यांचे समन्वय असून त्या ठिकाणी या फुलांचा हार चढवण्यात यावा असे ते पुजार्यांना सांगत असतात. शेतीला उद्योग समजून शिंदे नवनवीन प्रयोग शेतात राबवीत आहेत आणि इतर शेतकऱ्यांसमोर स्वतःचे उदाहरण निर्माण करीत आहेत.

# ग्रामरोजगार सेवकांना इतर राज्यात नियोजित वेळेवर मानधन मिळत आहे. मग महाराष्ट्रात उशीर का?दत्ता वाकसे

## मानधनाचा प्रश्न सोडवा अन्यथा भिक मागो आंदोलन करणार

**बीड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाचे संचलन व सनियंत्रण करणे, मजुरांवर देखरेख ठेवणे, दस्ताऐवज अद्यावत ठेवणारा ग्राम रोजगार सेवक तुटपुंज्या मानधनावर काम करीत असला तरी त्याला मागील नोव्हेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मानधन दिल्या गेले नसल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याने लवकरात लवकर मानधन देण्याची मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे. यांनी केली आहे केंद्र सरकारने सन-२००५ साली राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी या नावाची योजना आणून तिचे कायद्यात रूपांतर करून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अस्तित्वात आणून ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना १०० दिवसाची प्रत्येक जॉबकार्डला कामाचीहमी दिली तिचा विस्तार संपुर्ण भारतभर सन २००८ ला करण्यात आला असून मजुरांवर देखरेख ठेवण्याकरिता तसेच अहवाल सांभाळण्याकरिता व दस्तावेज अद्यावत ठेवण्याची जबाबदारीकरीता गाव स्तरावर ग्राम रोजगार सेवकांची नियुक्ती करण्यात आली असली तरी दीर्घकाळापासून अत्यल्प व तुटपुंज्या मानधन मिळणारा ग्राम रोजगार सेवक मानधन विना वंचित आहे. आज राज्यात शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याच्या नियोजीत तारखेला होत असून ग्राम रोजगार सेवकाला तुटपुंजे मानधन मिळत असलेतरी सुद्धा त्यांचे मानधन पाच महिन्याचा दीर्घ कालावधी होऊन भेटत नसल्याने ग्रामरोजगार सेवकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ग्रामरोजगार सेवकाचे मानधन झालेल्या कामाच्या ६ टके



निधीतून मिळत असल्याने सदर योजना केंद्र सरकारची असल्याने इतर राज्याच्या तुलनेत मासिक मानधनात तापवत असली तरी इतर राज्यात नियोजित वेळेवर मानधन मिळत आहे. मग महाराष्ट्रात उशीर का? असा सवालही शेफर्ड इंडिया इंटरनॅशनलचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी निर्माण केला आहे. २०१६ पासून प्रवास व अल्पोहार भत्ता, स्टेशनरी खर्च, प्रोत्साहन मानधन तसेच वाढीव मानधन व नोव्हेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२४ पासून रोजगार सेवकांचे थकीत मानधन मिळाले नसल्याने सणासुदीच्या काळात महागाईने होरपळून गेलेल्या ग्राम रोजगार सेवकाचे प्रलंबित मानधन ५, महिन्यापासून होईल ही अपेक्षा होती. पण मानधन जमा झाले नसल्यामुळे रोजगार सेवकामध्ये रोष व्यक्त होत आहे. वडवणी तालुक्यातील ४२ ग्रामरोजगार सेवक काम करीत आहेत. त्यांना लवकरात लवकर मानधन देण्यात यावे अशी मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केली आहे.


### ..तर रोजगार हमी मंत्र्याच्या दारासमोर भीक मागून आंदोलन करणार!

गेल्या पाच ते सहा महिन्यापासून बीड जिल्ह्यातील सह वडवणी तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांना मानधन मिळाले नसून सध्या खूप मोठ्या संकटाचा त्यांना सामना करावा लागत आहे कुटुंबाला उदारनिर्वाह करण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्राम रोजगार सेवक काम करत आहे परंतु त्यांना त्यांचा मोबदला व त्यांचे हक्काचे मानधन मिळत नाही ही या महाराष्ट्र राज्यातील रोजगार सेवकांची शोकांतिका आहे त्यामुळे रोजगार हमी मंत्र्याच्या दारासमोर भीक मागो आंदोलन करणार आहे रोजगार सेवकांना सोबत घेऊन वाकसे यांनी म्हटले आहे

# ठाणे : दिवा शहरात शिवानंद प्रतिष्ठान



/ दिवा शिवसेना आयोजित भव्य दहीहंडी सराव शिबीर उत्साहात संपन्न झाले. प्रसंगी अनेक दहीहंडी मंडळाच्या गोविदानीं हजेरी लावून थर लावले तर



भरपावसात गोविंदाचा उत्साह शिगेला पोहचलेला पाहवयास मिळाला. प्रसंगी अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली. (फोटो - संतोष पडवळ

# कष्टाच्या वाटाफला डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे)**

छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघ यांच्या वतीने पुरोगामी स्त्रीवादी साहित्य संमेलनात पाठ्यपुस्तकातील कविता' पाणपोईकार' अय्युब पठाण लोहगावकर यांना 2024 चा राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार 'कष्टाच्या वाटा' या बालकथा संग्रहाला जाहीर झाला आहे. असे पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघाचे अध्यक्ष समाधान दहिवाळ यांनी कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना निवड पत्राद्वारे कळविले आहे.हा पुरस्कार दिनांक 31 ऑगस्ट 2024 रोजी शनिवारी संध्याकाळी चार वाजता संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथील भानुदास चव्हाण सभागृहात



होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पठाण यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र ,शाल -श्रीफळ असे असून कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या कष्टाचा वाटा या बाल कथासंग्रहाला हा सलग सातवा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे.

# आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाला आमदार कसा हावा ? तर भीमराव धोंडे सारखा आसावा

**पाटोदा (प्रतिनिधी)**

आपल्या आमदारकीच्या काळात फक्त नुसते सुख दुःखात भेटच न देत बसता मतदारसंघाच्या विकासासाठी मंत्रालयात जाऊन कोट्यवधी रुपयांचा विकासाला निधी आनुन एवढ्यावरच न थांबता आपल्या मतदारसंघातील मुलं मुली शिकुन मोठी झाली पाहिजेत म्हणून मतदार संघात शिक्षण संस्थेचे जाळे उभा करून विद्यार्थ्यांना आपल्या गावात आपल्या तालुक्यात आपल्या भागात शिक्षणाची सोय करुन त्यातुन आपल्या मतदार संघातील हजारो युवकांना नौकऱ्या व रोजगार उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांचा हिता साठी कारखाना उभारनारा असावा तो राजकीय डावपेच्यात बंद झाला मात्र शेतकऱ्यासाठी आमदार भीमराव धोंडे यांची तळमळ कधीच थांबली नाही त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान व आधुनिक शेती करता यावी म्हणून भव्य आसे कृषी प्रदर्शन भरवण्यास सुरुवात करुन शेतकरी बांधवा साठी सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले असल्याने आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाला आमदार नुसता सुख दुःखात भेटी देऊन तेवढ्यावर न थांबता मतदार संघाच्या विकासासाठी मुंबई दिल्लीला जाऊन विविध विकास कामे आनुन मतदार संघातील मुला मुलींच्या शिक्षणाची सोय करणारा, शेतकऱ्यांसाठी कारखाने,कृषी प्रदर्शन भरवणारा युवकांना रोजगार मिळावा म्हणून विविध उद्योग उभारणारा आमदार भीमराव धोंडे सारखा आमदार आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात आसावा असे मत आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील सामान्य जनता आता मनु लागली




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077